# 'स्त्री भ्रुण हत्या: एक समाजशास्त्रीय मूल्यमापन" 'आई हवी ....... ताई हवी ...... पण त्यासाठी जगात बाई तर हवी ?'

प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे

वसुंधरा महाविद्यालय जुळे, सोलापूर

भारतीय समाजाची ओळखच पारंपारीकतेने होते. धर्म संस्कृती आणि परंपराचा प्रभाव या समाजावर असल्याने शास्त्रशुध्द सामाजिक विचाराची सुरुवात उशीरा झाली आहे. हिंदुची विचारसरणी येथील समाजाच्या जडणघडणीस आधारभुत ठरली आहे. स्त्री - पुरुष समता हा प्राचीन काळापासून वादातीत मुद्दा राहिला आहे. मनुवादीप्रवृत्तीने स्त्रीयांच्या स्वातंत्र्या विषयीचा हक्क विविध पध्दतीने हिरावून घेतला आहे. मग तो जगण्याचा असो् की जन्माचा ! सतीप्रथा, बालविवाह, विधवाविवाह बंदी व वारसा हक्क नाकारणे हुंडापध्दती इ. कनिष्ठ प्रथा समाजात रुढ करुन स्त्रीयांना अपमानीत केले आहे. शिक्षण, राजकारण, अर्थकारणापासून त्यांना वंचीत करुन त्या पुरुषांच्या कशा पध्दतीने दास किंवा गुलाम होतील अशी व्यवस्था मजबूत करण्यावर भर या पुरुषप्रधान संस्कृतीने दिला आहे. एकीकडे स्त्रीची देवी म्हणून पूजा करणारा किंवा 'स्वामी आईविना तिन्ही जगाचा भिकारी' असा म्हणणारा समाज तिचे अस्तित्वच नाकारत आहे. तिच्या जन्माची अंसतुष्टता दाखवून तिचा जन्मच रोखत आहे. सुशिक्षीत समाजातही स्त्रीयांना दुय्यम स्थान असणे ही फार लाजीरवाणी बाब आहेच पण त्याही पुढील बाब म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा गौरवापर करुन मुलीची गर्भातच हत्या करणे ही अत्यंत खेदाची व सामाजिक कलंक किंवा कीड असल्याची बाब आहे. या हत्येला ईश्वरसुध्दा माफ करणार नाही. एका लहान कळीचा तुम्ही जगण्याचा अधिकार हिरावून घेता तोही तुमच्या स्वार्थासाठी ! कारण ती मोठी झाल्यावर लग्नाचा हुंड्याचा खर्च तुम्हाला झेपन नाही म्हणून किंवा वंशाचा दिवा पाहिजे म्हणून ? पण तुमच्या डोक्यात हे का घुसत नाही की, 'पणतीच नसेल तर दिवा कोठून लागणार आहे ?' एक वेळ अशी येईल की, स्त्रीजातीचे अस्तित्व संपूष्टात आल्यामुळे मानव जातच संपुष्टात येईल. विश्वाच्या उत्पत्तीसाठी स्त्री जशी कारणीभूत आहे. तशीच जगाच्या विनाशासाठी सुध्दा ठरेल.

म्हणून वेळीच आपण या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करण्याची गरजआहे. स्त्री पुरुष समता जशी महत्वाची आहे त्याबरोबरच स्त्री-पुरुष समतोल असणेही गरजेचे आहे. महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष प्रमाणातील स्थीती चिंताजनक आहे. एक हजार पुरुषांमागे ९२५ असे प्रमाणे आहे. भारतामध्ये हे प्रमाणे ९४० आहे. महाराष्ट्राचा स्त्रीभ्रहत्या संदर्भात सहावा क्रमांक लागतो आणि यामध्ये बीड जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. पुरोगामी समजणाऱ्या महाराष्ट्राला हा मोठा कलंक आहे. यासाठी मागे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अशी कारणे जबाबदार असली तरीही वंशाला मुलगा हवा ही मानसिकता त्यासाठी अधिक जबाबदार आहे. वौज्ञानिक अविष्काराचा परिणाम म्हणून अन्ट्रासाऊंड (सोनोग्राफी) चा शोध लागला आणि त्यातून गर्भातील असणारे भ्रुण स्त्री आहे की पुरुष असे लिंगनिदान केले जाऊ लागले तेव्हा हा प्रश्न गंभीररुपाने उद्यास आला. खरे, तर सोनोग्राफीचा वापर गर्भातील भ्रुणाची शारीरिक व मानसिक अवस्था शोधण्यासाठी असते पण मानवाने याचा गौरवापर केला आहे व ही समस्या तीव्र केली आहे.

शोधानिबंधाची उद्दिष्टे :-

१) स्त्री - पुरुष प्रमाणातील असमतोलाचा भारतातील व महाराष्ट्राच्या संदर्भात आढावा घेणे.

२) स्त्री-भ्रुणहत्या ही आधुनिक काळातील एक ज्वलंत सामाजिक प्रश्न म्हणून अभ्यासणे

३) स्त्री भ्रुणहत्यांच्या कारण, परिणामांचा चिकित्सक अभ्यास करणे व उपाय मांडणे.

गृहितेके

स्त्री – पुरुष प्रमाणातील असमतोलाचे निश्चित कारण म्हणून स्त्री भ्रुणहत्या कारणीभूत ठरली आहे.

नव्या तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर करुन गर्भलिंग निदान चाचणीतून स्त्रीभ्रुणहत्या होत आहेत.?

कायद्याची कडक अमलबजावणी नसल्यामुळे स्त्री भ्रुणहत्या घडून आहे यामुळे समाजाचे संतूलन ढासाळले आहे.

आशयविश्लेषण :-

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्त्री – भ्रुणहत्येचा चिकित्सक पध्दतीने अभ्यास करण्यासाठी कारण व परिणामांचा मिमांसा केली आहे. सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व अज्ञान हे घटक स्त्रीभ्रुणहत्येसाठी जबाबदार असले तरी इतर ही घटक कारणीभूत असल्याचे संशोधनात आढळले आहे. त्याची तपशीलवार मांडणी खालील प्रमाणे केली आहे.

१) स्त्री-पुरुष प्रमाणाची सद्यस्थिती :-

सद्यस्थितीत पुरुषांचे प्रमाण स्त्रीयांच्या तुलनेत अधिक आहे. ज्याकाळात तंत्रज्ञान प्रगत नव्हते. त्या काळातही स्त्रीयांचे प्रमाण कमीच दिसून येते. खालील तक्त्यावरुन या आकडश्ाांचा खेळ व मेळ समजून येईल.

□ स्त्री – पुरुष प्रमाण (दरहजारी)

| वर्ष | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारत | ९७२ | ९६४ | ९५५ | ९५० | ९४५ | ९४६ | ९४१ | ९३० | ९३४ | ९२६ | ९३३ | ९४० |
| महाराष्ट्र | --- | --- | ९५० | ९४७ | ९४९ | ९४१ | ९३६ | ९३६ | ९३७ | ९३६ | ९२२ | ९२५ |

महाराष्ट्राचा वयोगटानुसार लिंगप्रमाण (दरहजारी)

| वयोगट | १९९१ | २००१ |
|---|---|---|
| ०-६ | ९४५ | ९१३ |
| ७-१४ | ९३३ | ९१८ |
| १५-१९ | ९२२ | ८९३ |

महाराष्ट्रातील बालमृत्युचे प्रमाण

| वर्ष | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बालमृत्यु | | २७१ | २३७ | २०७ | २०८ | १०९ | ९६ | ७२ | ५४ | ४८ | ४२ |

वरील तक्त्यावरुन महाराष्ट्रातील बालमृत्युच्या प्रमाणात घट होताना दिसत असली तरी स्त्री बालमृत्यु जास्त आढळतात. तसेच १९९१ व २००१ या वर्षातील ०-६ या बालवयोगटातील स्त्री व पुरुष प्रमाण पाहिल्यास आपणास स्त्रीयांचे प्रमाण कमीच आढळते. स्त्रीयांचे महत्त्व अर्थिक, सामाजिक, राजकीयदृष्ट्या कमी मानले गेले. कारण स्त्रीचे अधिकार क्षेत्र 'चुल व मूल' एवढेच मानले गेले. स्त्रीयांच्या संदर्भात स्त्री ही एक उपभोगाची वस्तु मानली गेली. यासाठी त्यांनी धर्मग्रंथामध्येच तरतूद केली.

२) स्त्री-भ्रुणहत्यांची कारणमीमांसा :-

अ) अनिष्ठ प्रथा व परंपरा :-

पुरातकाळापासून सतीप्रथा, केशवपन, मूरळी, दासी अनिष्ठ प्रथा व परंपरेने समाज ढवळून निघाला होता. मानसिकदृष्ट्या न्युनगंड मनामध्ये निर्माण झाल्याने भय कायमस्वरुपी रहिल्याने 'मुलगीच नको' ही मानसिकता बनु लागली आहे.

| अ.क्र | वर्ष | पुरुष | स्त्री | एकूण (%) |
|---|---|---|---|---|
| १) | १९५१ | ३१.४ | ९.८ | २०.९ |
| २) | १९६१ | ४२.१ | १६ | २९.८ |
| ३) | १९७१ | ५१ | २६.४ | ४१ |
| ४) | १९८१ | ६९.६६ | ४१.०१ | ५५.५ |
| ५) | १९९१ | ७६.५६ | ७२.३६ | ६४.९ |
| ६) | २००१ | ८६.३ | ६७.५ | ७७.३ |

तक्ता : महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाण

वरील तक्त्यानुसार आपणास असे दिसून येते की, स्त्री साक्षरता जरी वाढत असली तरी पुरुष साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी आहे.

आजही राजस्थानसारख्या राज्यांमध्ये सतीप्रथा व बालविवाह होतात. जरी कायद्याने बालविवाहास प्रतिबंध घातले असले तरी वराचे वय २१ पेक्षा कमी व १८ वर्षापेक्षा वधुचे वय कमी असणारे बालविवाह पळवाटा शोधून विवाहनोंदणी न करता आटोपशीरपणे ठराविक नातेवाईकांच्या उपस्थितीत अज्ञातस्थळी पर पाडले जातात. परंतु कमी वयात विवाह झाल्याने अपरिपक्व मुले होऊन जन्मापूर्वीच मृत्युमूखी पडतात. कारण कमी वयात मुलीची शारिरीक व मानसिक स्थिती विकसित होऊ शकत नाही.

ब) वारसाहक्क नाकारल्यामुळे :-

१९५५ हिंदुविवाह कायद्यानुसार वारसा हक्क मंजुर करण्यात आला आहे. पण समाजमान्य झालेला नाही. कारण 'स्त्री परक्याचे धन आहे' जर आपण वारसाहक्काने स्त्रीस अधिकार दिल्यास अनेक क्लिस्ट स्वरुपाच्या समस्या निर्माण होतील.

उदा. मुलीच्या संपत्तीत सासरचे लोक हक्क सांगतील त्यामुळे आपल्या वारसदारांना कोर्टकचेज्यांच्या पायज्या झीजवाया लागतील या न्युनगंडातून असे झाले आहे. याचे कारण 'हम दो, हमारे दो' ही राष्ट्रीय लोकसंख्या १९८६च्या धोरणाची घोषणा ही स्त्री-भ्रुणहत्येस अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरली आहे. कारण सर्वप्रथम मुलगी झाल्यास वारसाहक्कासाठी घराण्याचा वारस शोधण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातून लोक गौरमार्गाने स्त्री भ्रुणहत्या घडुन येतात.

क) दैववाद व अज्ञान :-

महाराष्ट्रातील सर्व सामाजिक समस्यांचे मुळे दैववाद व अज्ञान आहे. त्याच प्रमाणे स्त्री भ्रुणहत्यासाठीही हेच कारण जबाबदार आहे. उदा. 'मुलगा हा वंशाचा दिवा आहे', 'म्हातारपणाची काठी', 'पैसे कमाविण्याचे साधन', 'हुंडा भरपूर मिळतो', 'कुटुंबाचा वारसा चालवितो.' इ. कल्पनेतून 'मुलगाच हवा' हा अट्टहास प्रत्येक कुटुंबामध्ये केला जातो. यामुळेच 'मुलगी अपशकूनी, पांढज्या पायाची' मानतात. यामुळेच नाखुशीनेच मुलीचा जन्म स्विकारला जातो.

ड) पुत्र प्राप्तीचा हव्यास :-

'लहान कुटंुब' ही संकल्पना कायद्याने स्विकारल्याने लोकांनी याचा धसका घेतला. पहिली मुलगी झाल्यानंतर दुसरे अपत्य मुलगाच असावा यासाठी वरपक्षाचे लोक कमालीचा प्रयत्न करु लागले. मग यासाठी गर्भलिंगनिदान चाचणी करुन भ्रुण स्त्री जातीचे असेल तर डॉक्टरची मनधरणा करुन गर्भपात केला जाऊ लागला. गर्भपातासाठी आईची परवानगी नसली तरीही तिच्या वर जबरदस्ती केली जाऊ लागली आहे. तिला वंश बुडवी म्हणू लागले. गर्भलिंगनिदानबंदी कायद्याने महाराष्ट्र शासनाने १९८८ साली तर भारत शासनाने १९९४ साली केली आहे. पण गर्भपात करणारी मंडळी कायद्याला झुगारुन छुप्या व गौरपध्दतीने गर्भपात करु लागले डॉक्टर यासाठी ५०० रुपया पासून ते ३०,०००/- पेक्षा जास्त रक्कम घेतो. म्हणून स्त्रिभ्रुणहत्येचे स्वरुप संघटित गुन्हेगारी समजुन मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविणे गरजेचे आहे.

इ) कुटुंबाचे दारिद्रय :-

कुटुंबाचे दारिद्रयही स्त्री-भ्रुणहत्येसाठी कारणीभूत ठरले आहे. मुलीचे लग्न व लग्नासाठी द्यावा लागणारा हुंडा या कारणानेही स्त्री - भ्रुणहत्येचे प्रमाण वाढले आहे. वाढती महागाई व हुंडश्ाची वाढती रक्कम आलिकडे मुलींच्या बापाचा चिंतेचा विषय झाला आहे. पुर्वीच मुली आहेत. आणखी मुलगी झाली तर तिच्या लग्नाचा खर्च पेलता येईल की नाही? या चिंतेतून स्त्री-भ्रुणहत्या घडुन येतात. पण अडाणी किंवा गरीब वर्गात सुशिक्षित वर्गापेक्षा स्त्री- भ्रुणहत्येचे प्रमाण कमी आहे.

□ स्त्री-भ्रुणहत्येच्या परिणामांची मिमांसा :-

१) स्त्री-भ्रुणहत्या सामाजिकदृष्टश्ा अत्यंत गंभीर असून त्यामुळे कुटुंब व विवाहसंस्थेचे स्वास्थ्य धोक्यात येणार आहे. २) मुलींच्या घटत्या प्रमाणामुळे एकवेळ अशी येईल की लग्नासाठी वधुमूल्य तर द्यावेच लागेल पण त्यातही स्पर्धा वाढीस लागून वधुसाठी खुन,मारामाज्या, अपहरण, बलात्काराचे प्रश्न गंभीर स्वरुप धारण करतील. ३) यामुळे सामाजिक संतूलन व स्वास्थ धोक्यात येणार आहे. बहुपती विवाहासारख्या प्रथा अस्तित्वात येतील. ४) सामाजिक संकेत टाळून 'बळी तो कान पिळी' अशीही अवस्था निर्माण होईल. ५) यामुळे समाजातील नाते संबंधालाच सुरुंग लागेल. समाजात मोठश्ा प्रमाणात विषमता वाढेल.

□ स्त्री-भ्रुणहत्या रोखण्यासाठी उपायात्मक बाजू :-

१) स्त्री-भ्रुणहत्या केवळ कायद्याने आटोक्यात येणार नाही तर त्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती हवी आहे. २) दुरदर्शन, रेडीओ व वृत्तपत्रे या प्रसारमाध्यामावरुन स्त्री-भ्रुणहत्ये विरोधात प्रबोधन व्हावे. ३) लिंगनिवडीस कायद्याने बंदी आहेच पण ती व्यापक व कडक व दंडात्मक स्वरुपात आमलात आणावी. ४) दोषी व्यक्तीस कलम ३०२ नुसार सदोष मनुष्य वधाचा गुन्हा पात्र ठरवावा. ५) सर्व सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी तसेच तपासणी ऑनलाईन करावी. सामाजिक व स्वयंसेवी संस्थानी यासाठी पुढाकार घ्यावा. ६) शासनाने समाजात मुलीच्या जन्माची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध कार्यक्रम व उपक्रम राबवावेत. तसेच मुलगी जन्मल्याबरोबर तिच्या १८ वर्षापर्यंत शासनाने विमा रक्कम भरावी. ७) लेक लाडकी अभियान राबवावे, बालिकादिन साजरा करावा. सेव्ह द बेबी गर्ल डॉट कॉम अभियान अधिक यशस्वी करावे. ८) हुंडापध्दती कायद्याने समुळ नष्ट करावी. तसेच सामुदायिक विवाह सोहळ्याचा व त्यांच्या भावी संसाराचा खर्च शासनामार्फत व्हावा.

असे असले तरी जो पर्यंत मुलीलाच मुलगा मानले जात नाही तसेच वंशाचा दिवा समजला जात नाही. तो पर्यंत स्त्री-भ्रुण हत्या थांबणार नाहीत. म्हणून प्रथमत: सामाजिक व मानसिक प्रबोधनही महत्वाचे ठरते.

□ निष्कर्ष :-

त्री भ्रुणहत्या रोखण्यापुरतेच नव्हे तर स्त्रीयाना समाजामध्ये सर्वार्थाने संरक्षण मिळावे म्हणून कायद्यात्मक तरतूदी करणे गरजेचे आहे. १९६१ साली हुंडाप्रतीबंधक कायदा अमलात आला असला तरीही हुंडा घेणेदेणे थांबले नाही यासाठी समाजाची मनोवृत्ती बदलणे गरजेचे आहे. मुलीलाच वंशाचा दिवा मानून तिच्या जन्माचे स्वागत केले तर समतोल ढासळला जाणार नाही. सोलापूर मध्ये च्छ्ध्द्व क्द्ध्व्र्‍ अभियान राबवले जाते. कोल्हापूरमध्ये सेव्ह द बेबी गर्ल डॉट काम सुरु करुन सोनोग्राफी केंद्राची नोंदणी ऑनलाईन केली आहे. मुंबईमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाणने स्त्रीभ्रुण रोखण्यासाठी जागर हा जाणीवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा हा कार्यक्रम हाती घेतला आहे.

१) स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल हा जागतिक चिंतेचा विषय झाला आहे. यामुळे एक दिवस जगाचा विनाश अटळ आहे. नातेसंबंध व कुटुंबसंस्था टिकवायची असेल तर स्त्रीयांचे अस्तित्व अधिक गरजेचे आहे. त्याशिवाय कुटुंब संस्था उदयास येऊ शकत नाही.

२) स्त्री- जन्माचे स्वागत व सन्मान करण्याची मानसिकता प्रत्येक समाजामध्ये निर्माण झाली पाहिजे मुलीलाच मुलाप्रमाणे वागणूक द्यावी केवळ वंशाचा दिवा म्हणून ही बाब पाहण्यापेक्षा भविष्याचे गांभीर्यही लक्षात घेणे गरजेचे आहे.

म्हणूनच स्त्री-भ्रुणहत्या थांबविणे काळाची गरज आहे. समाजाची पारंपारीक मनोवृत्ती बदलण्यासाठी जनजागरण मोहिम राबवावही व मुलगा मुलगी समान मानावे मुलींना जगण्याचा तिचा हक्क द्यावा. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एकत्रीत प्रयत्नाची गरज आह

□ संदर्भ :-


१) इंडियन सोशल प्रोबलेम्स - राम आहूजा

२) इंडियन सोशल प्रोबलेम्स - जी. आर. मदन

३) स्त्री-भ्रुण हत्या विरोधी अभीयान - जयक्रांती चर्चा सत्र २०१२

४) प्रतियोगीता दर्पण -

५) लोकराज्य - सप्टेंबर २०११

६) वृत्त पत्रे - दिव्य मराठी, सकाळ

७) इंटरनेट गुगल सर्च

८) समाजशास्त्रीय विचारधारा:- ज्योती डोईफोडे